# मगधनरेश वैदेहीपुत्र अजातशत्रु

## (वेदेहिपुत्त अजातसत्तु)

हिन्दी पुस्तकाचा मराठी अनुवाद



विपश्यना विशोधन विन्यास

# मगधनरेश
# वैदेहीपुत्र अजातशत्रु
## (वेदेहिपुत्त अजातसत्तु)

हिन्दी पुस्तकाचा मराठी अनुवाद

विपश्यना विशोधन विन्यास
धम्मगिरी, इगतपुरी

# M48- मगधनरेश वैदेहीपुत्र अजातशत्रु
## (वेदेहिपुत्त अजातसत्तु)

© विपश्यना विशोधन विन्यास
सर्वाधिकार सुरक्षित

प्रथम आवृत्ती ः सप्टेंबर 2024

**मूल्य: ₹**
**Price: Rs.**

ISBN 978-81-7414-485-0

**प्रकाशक:**
**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - 422403
जिल्हा- नाशिक, महाराष्ट्र
फोन: ०२५५३-२४४९९८, २४३५५३, २४४०७६,
२४४०८६, २४४१४४, २४४४४०
Email: vri_admin@vridhamma.org
Website: www.vridhamma.org

**मुद्रक:**
**अपोलो प्रिंटिंग प्रेस**
२५९, सीकॉफ लिमिटेड, ६९ एम. आय. डी. सी.,
सातपुर, नाशिक-४२२००७, महाराष्ट्र

# मगधनरेश वैदेहीपुत्र अजातशत्रु
## (वेदेहिपुत्त अजातसत्तु)

विषयानुक्रमणिका


**प्रकाशकीय ........................................................ 5**

**अद्भुत जन्म ........................................................ 9**

अजन्मा शत्रू ........................................................ 9

अजातशत्रुचा जन्म ................................................ 9

**देवदत्ताचा पाश ................................................. 11**

पुत्रापासून सावध राहण्याचा उपदेश ........................... 11

कुमारवर देवदत्तचा पाश ........................................ 11

पितृ-हत्यारा ...................................................... 12

पित्याची स्नेहाची अनुभूती ...................................... 14

भाऊ सीलवाच्या हत्येचे कपट .................................. 15

**दुष्ट उद्देशाने रचलेला कट ...................................... 16**

बुद्धांच्या हत्येसाठी राजपुरुषांची नियुक्ती ....................... 16

भगवानांवर शिलाप्रहार ........................................... 19

नालागिरी नाग प्रसंग .............................................. 20

तथागतांचे अकाली परिनिर्वाण शक्य नाही ..................... 22

अजातशत्रुद्वारे देवदत्तवर बहिष्कार ............................. 23

**तप उन्नतीचे मूळ .............................................. 24**

तप करणे शिका .................................................. 24

वज्जींना सात अपरिहानीय धर्मांचा उपदेश ..................... 25

भिक्षूंना सात अपरिहानीय धर्मांचा उपदेश ..................... 28

**धर्म श्रेष्ठी....................................................31**

जोतिक-महाल ....................................................31

अनासक्त जोतिक ..................................................33

**शांत-चित्ताला सुख-चैन ..........................................35**

शांत-चित्त सुखाने झोपतो ........................................35

अकुशलचा त्याग आणि कुशलचा अभ्यास ....................35

सुखाची झोप.......................................................36

**विविध प्रकरण....................................................38**

भेद-नीती सफल झाली ............................................39

मामाचा अंतिम संस्कार ...........................................40

पाच हत्तीबळ-युक्त..................................................41

**कल्याण-मित्राची संगत..........................................42**

अजातशत्रूद्वारे बुद्धांचे दर्शन......................................42

बुद्धं सरणं गच्छामि...............................................45

क्षमायाचना..........................................................48

अजातशत्रुचा आनंद ..............................................49

वास्तविक श्रामण्यफळापासून वंचित ...........................50

**भगवानांची धातु-सुरक्षा ........................................51**

शोक संतप्त अजातशत्रु............................................51

तथागतांचे पार्थिव शरीर ..........................................52

प्रथम धम्म-संगिती.................................................54

धातु-निधानची प्रतिष्ठापना .......................................55

**विपश्यना साधना केंद्र ...........................................56**

# प्रकाशकीय

जन्म होण्यापूर्वीच त्याला आपल्या पित्याचा शत्रू म्हणून घोषित केले गेले म्हणून त्याचे नाव 'अजातशत्रु' असे पडले. तो मगधनरेश बिंबिसार व कोशलदेवीचा पुत्र होता. कोशलदेवी कोशलराज प्रसेनजितची बहीण होती. माझ्या गर्भातून जन्मलेला पुत्र राजाचा वध करणारा होईल हे समजल्यावर राणीने गर्भ पाडण्याचा प्रयत्न केला पण महाराजांनी त्यावर पहारा बसविला. भगवानांनी एकदा राजाला सावध केल्यावरही त्याने त्या गोष्टीकडे साफ दुर्लक्ष केले.

बुद्धांबद्दल देवदत्तचा शत्रूभाव पूर्वीपासूनच होता त्यात उपासकांकडून भगवानांचा होत असलेला लाभ-सत्कार पाहून त्याचा द्वेषाग्नी आणखीनच प्रज्वलित झाला. आध्यात्मिक प्रगतीकडे न जाता त्याने लोकीय समाधी मार्गाने ऋद्धी प्राप्त केल्या आणि चमत्कार दाखवून अजातशत्रुला आपल्या वशमध्ये केले. त्याला असे भरवून दिले की तुझा पिता खूप दिवस जीवित राहील त्यामुळे तुला खूप कमी दिवस राजसुख प्राप्त होईल. तेव्हा त्याची हत्या करुन आताच राज्य हस्तगत करुन घे. अजातशत्रुने एकदा एका रात्री असा प्रयत्न केला पण त्यात तो सफल झाला नाही. तेव्हा देवदत्तच्या प्रेरणेने वैदेहीपुत्र अजातशत्रुने पित्याला तुरुंगात टाकले. तेथे हळू हळू त्याचे अन्न-पाणी बंद करुन, न्हाव्याकडून त्याच्या पावलांना चिरुन, त्यात मीठ भरले व आगीत जाळून त्याला मारुन टाकले.

अजातशत्रुने राजसिंहासन प्राप्त केल्यानंतर देवदत्तने आपली मनोकामना त्याला सांगितली. तो बुद्धांना मारुन महासंघाचा प्रमुख होऊ इच्छित होता. त्यासाठी राजा अजातशत्रुने त्याला सहकार्य केले. बुद्धांना मारण्यासाठी राजाकडून देण्यात आलेले एकतीस सैनिक बुद्धांच्या प्रतापाने त्यांचे शिष्य बनले. देवदत्तमध्ये पाच हत्तींचे बळ होते. स्वत: बुद्धांना मारण्यासाठी त्याने एकदा गृद्धकूट पर्वतावरुन एक विशालकाय शिळा त्यांच्या अंगावर पाडण्यासाठी गडगडत ढकलून दिली. ती तर मध्येच

अडकली पण तिचा एक तुकडा पायावर पडल्यामुळे बुद्धांच्या पायाला जखम झाली. त्यात ही अयशस्वी झाल्यानंतर माहूताद्वारे त्याने पिसाळलेल्या नालागिरी हत्तीला बुद्धांच्या अंगावर सोडले. पण तो हत्ती बुद्धांच्या जवळ पोहोचता-पोहोचताच, त्यांच्या शीतल मैत्रीच्या तरंगांनी शांत झाला. त्यांची चरण-धूळ आपल्या मस्तकी लावली. बुद्ध कोणाकडूनही मारले जाऊ शकत नाहीत. नालागिरी प्रकरणाने देवदत्तचे सारे कपट उघडे पडले. प्रजा भडकून उठली म्हणून राजा अजातशत्रुने त्याला लाभ सत्कार देणे बंद केले. देवदत्त आता भीक मागून आपला आणि आपल्या साथीदारांचा कसाबसा जीवन निर्वाह करू लागला.

महाराज अजातशत्रु समृद्ध वैशालीचा आपल्या राज्यात समावेश करु इच्छित होता, पण बुद्धांनी शिकविलेल्या सात अपरिहानीय धर्मांचे पालन करणाऱ्या वज्जिंना कोणी जिंकू शकत नव्हते. तसेच भगवानांनी भिक्षूंना सात अपरिहानीय धर्म शिकविले, ज्यांचे पालन केल्याने संघाची उन्नतीच होईल, अवनती नाही. राजा झाल्यावर बालपणी पाहिलेल्या जोतिक श्रेष्ठीचा महाल जिंकण्याचा अजातशत्रुने प्रयत्न केला पण त्यात तो यशस्वी झाला नाही. अजातशत्रुचे मामा महाराज प्रसेनजित यांचा, त्यांच्या सेनापतीने छळ केल्यामुळे मगधकडे येताना रस्त्यात मृत्यू झाला. वैदेहीपुत्र अजातशत्रुने त्यांचा अंत्यसंकार केला.

भगवानांच्या दर्शनासाठी जेतवनात जात असताना देवदत्त जमिनीत गाडला गेला. या बातमीने पित्याशी केलेल्या दुष्कृत्यांचा विचार करुन राजा अजातशत्रु व्याकूळ आणि बेचैन राहू लागला. त्याच्या सांगण्यावरुन राजवैद्य जीवक त्याला भगवानांकडे घेऊन गेले. तेथील अत्यंत शांत वातावरण पाहून तो खूप प्रभवित झाला. तशाच शांतीची कामना त्याने आपल्या पुत्रासाठी केली. भगवान आणि संघाला नमस्कार करुन तो एका बाजुला बसला. त्याने प्रश्न विचारल्यावर भगवानांनी श्रामण्याचा लौकीक लाभ आणि पारलौकीक हितासंबंधी त्याला चांगल्या प्रकारे समजविले. पित्याची हत्या केल्याच्या पापासाठी त्याने भगवानांची क्षमा मागितली. भगवानांची पुण्यसंपत्ती पाहून तो पुलकित आणि रोमांचित झाला. तो निघून गेल्यावर भगवान भिक्षूंना म्हणाले– जर वैदेहीपुत्राने आपल्या

पित्याच्या हत्येचे पाप केले नसते तर याच आसनावर त्याला स्रोतापत्ती फळ प्राप्त झाले असते.

कुशीनारामध्ये भगवानांच्या महापरिनिर्वाणाची बातमी ऐकून राजा शोकग्रस्त आणि बेशुद्ध झाला. अमात्यांनी समजावल्यावर तो शांत झाला. नंतर सैन्यासह कुशीनाराला जाऊन त्याने भगवानांच्या अस्थी-अवशेष आणण्याचा निश्चय केला. तिथे एकत्रित झालेल्या आठ राजांमध्ये भगवानांच्या अस्थी-धातुंचे विभाजन करण्यात आले. वैदेहीपुत्राने भगवानांच्या अस्थीधातुवर एक भव्य चैत्य निर्माण केला. स्थविरांनी सांगितल्याप्रमाणे राजाने जुन्या विहारांमध्ये सुधारणा केल्या. त्यानंतर धर्म संगितीसाठी सप्तपर्णी गुहेमध्ये व्यवस्था केली. इतकेच नाहीतर स्थविर महाकस्सपांच्या मार्गदर्शनाखाली वैदेहीपुत्राने राजधानीमध्ये धातुनिधानाचीही स्थापना केली, जेणेकरून भविष्यात भगवानांचे धातु संपूर्णपणे सुरक्षित राहतील.

विपश्यना विशोधन विन्यास